# सुविख्यात शिक्षण शास्त्रज्ञ

व

# मॉन्टेसोरी शिक्षण पद्धतीच्या प्रणेत्या.

Mother Maria Montessori

१९६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २२८९



REFBK-0017747

COLLEGE OF EUROPEAN LANGUAGES.

# डॉ. मारिया मॉंटेसोरी

: लेखक :

प्रा. स. बा. हुदलीकर
ऑर्गनायजिंग सेक्रेटरी

मादाम मारिया मॉंटेसोरी जन्मशताब्दि
महोत्सव समिती

REFBK-0017747

३१ ऑगस्ट १९७०

* प्रकाशक
**प्रा. स. बा. हुद्लीकर**
कॉलेज ऑफ युरोपियन लँग्वेजिस
१२, नानाभाई लेन,
फ्लोरा फौंटन, मुंबई १

---

या पुस्तिकेचा प्रकाशन समारंभ महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री
नामदार मधुकरराव चौधरी यांच्या शुभहस्ते.
ता. ३१ ऑगस्ट १९७०

**किंमत १ रुपया**

( सर्व अधिकार लेखकाच्या स्वाधीन )

* मुद्रक
**चिंतामणि रघुनाथ देसाई**
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, डॉ. भालेराव मार्ग,
ज. शं. रोड, मुंबई–४.

# लेखकाचे दोन शब्द

आज डॉ. मारिया मॉंटेसोरी यांचा जन्मशताब्दिदिन आम्हीं मोठ्या श्रद्धाळू-पणें साजरी करीत आहोत. आजच्या या जागतिक महोत्सवाचे अध्यक्षपद नामदार मधुकरराव उर्फ बाळासाहेब चौधरी, महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री भूषवित आहेत हाही एक शुभयोगच आहे. नामदार बाळासाहेबांचा जन्म १९२८ सालचा व त्याचसाली मी व माझ्या पत्नीनें पुण्यास साऱ्या महाराष्ट्रातील मॉंटेसोरी पद्धतीनें चालविली जाणारी पहिली बालकमंदिर शाळा स्थापिली, हाही एक शुभयोगच आहे. या शुभमुहूर्तावर मादाम मॉंटेसोरींच्या चरित्राचें व शैक्षणिक वाङ्मयाचें स्मारक म्हणून नामदार मधुकररावांच्या शुभ हस्ते हें पुस्तक आज प्रसिद्ध होत आहे.

जनतेमधें मॉंटेसोरी शिक्षण पद्धतीचा प्रसार जितक्या लवकर होईल, जितक्या अधिक झपाट्यानें होईल तितक्या प्रमाणात आमच्या भावी नागरिं-कांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली जाईल अशी मला खात्री वाटते. जगामधें सौख्य नांदावें, समाजात समाधानी वृत्ति निर्माण व्हावी, युद्धे टाळली जावी, अशीच दरेकांची इच्छा असणार. पण तें साध्य करण्यासाठीं आपल्याला आटोकाट प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. मध्यवर्ति सरकार व प्रांतिक सरकार यांना बालशिक्षणाचें महत्त्व पटले आहे हें आम्हाला माहीत आहे. आमचे उर्वरित आयुष्य आम्हीं बालशिक्षणासाठी समर्पण करण्याचा आमचा जुना निश्चय पुनः घोषत आहोंत मॉंटेसोरी पद्धतीचा प्रसार करण्यासाठीं आमचें महाराष्ट्र सरकार व जनता पूर्णपणें मदत करील, अशी आम्हाला आशा आहे.

अशा या शुभप्रसंगी मादाम मारिया मॉंटेसोरी यांच्या पूज्य स्मृतीला आमची सहस्त्रशः श्रद्धांजलि.

**प्रा. स. बा. हुदलीकर**

मुंबई. ३१ ऑगस्ट १९७०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थल प्रत)

# डॉ. मारिया मॉंटेसोरी

## ( चरित्र व वाङ्मय )

जगांतील सर्व शिक्षणशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ यांत डॉ. मारिया मॉंटेसोरी बाईंचें स्थान निःसंशय अग्रगण्य आहे. त्यांच्या इतकी बालकांची सेवा दुसऱ्या कोणीहि केलेली नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्तीचे मुळीच होणार नाहीं. अशा थोर महिलेचा जन्म दिनांक ३१ ऑगस्ट १८७० रोजीं चिरावलीं ( इटली ) या लहानशा गावीं झाला. ही मुलगी भविष्यांत कोणी तरी प्रसिद्ध स्त्री होणार, हें बाल्यावस्थेपासूनच स्पष्ट दिसत होतें. सध्यां स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत जगांतील प्रत्येक देशानें पुढें पाऊल टाकलें आहे. परंतु ज्यावेळीं मादाम मॉंटेसोरी बाईंचा जन्म झाला, तो काळ स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत साऱ्या जगांतच पुरोगामी नव्हता. स्त्रियांना शिक्षण देणें पाप समजत. जगांतील सर्व देशांची त्या काळीं तीच अवस्था होती. त्याला इटली देशच कसा अपवाद असणार? अशी प्रतिकूल परिस्थिति असतांनाहि बाईंनीं आपल्या शिक्षणास सुरवात केली.

शाळेंत शिकत असतांना बाईंना त्यांच्या शिक्षकिणीनें विचारलें, " मारिया, तूं पुढें कोण होणार ? " त्यावेळीं छोटया मुलीनें उत्तर दिलें, " मी इंजिनियर होणार ! शिक्षिका होणार नाहीं ! "

शिक्षकिणीचा धंदा व्यर्थ असून लोकांच्या अनादरास पात्र होण्याचें

मात्र तें एक उत्कृष्ट साधन आहे अशी त्यांची समजूत झाली होती. म्हणून त्यांनीं इंजिनियर व्हायचें ठरविलें असले पाहिजे. परंतु त्यावेळीं सबंध इटलीमध्यें स्त्रियांना इंजिनियरिंगचा धंदा शिकण्याची कोठेंच सोय नव्हती. म्हणून या मुलीला मुलांच्या शाळेंतच प्रवेश मिळविणें प्राप्त झालें. तिची आई किंवा वडील रोज तिच्याबरोबर शाळेंत जात असत व संध्याकाळीं तिला घरीं परत आणीत. ती शाळेंत इतर मुलांपासून अलिप्त अशी एका कोपऱ्यांत बसून राही. मधल्या सुटीच्या व जेवणाच्या वेळीं तर ती एका खोलींत बसून आंत दरवाजा बंद करून घेई व दरवाजावर रखवालदार ठेविलेला असे. तिला गणित विषयाची अत्यंत आवड होती व तें शिक्षण मुलांच्या शाळेशिवाय इतरत्र मिळणें अशक्य असल्यामुळें विचारीला अशा तऱ्हेचे हाल सोसावे लागत. पण तिला त्याचें कांहींच वाटत नसे.

त्याकाळीं स्त्रिया शिक्षिकेच्या पेशांत पडत असत. कारण तो एकच धंदा त्यांना करतां येण्यासारखा होता. दुसऱ्या कोणत्याच प्रकारच्या उच्च शिक्षणाची व्यवस्था स्त्रियांसाठीं नव्हती. लहाणपणीं शिक्षिकेच्या धंद्यावर नाराज असलेली ही मुलगी मोठेपणीं शिक्षणशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ बनली ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे.

शाळेंतील शिक्षण पूर्ण झाल्यावर बाईनीं कॉलेजमध्यें ( महाविद्यालयांत ) प्रवेश केला. यावेळीं मात्र बाईंना लोकापवाद व टवाळी यांना फार तोंड द्यावें लागलें. प्रत्यक्ष वडिलांचाहि त्यांना याबाबतींत फार विरोध झाला. एका घरांत राहूनहि वडील आपल्या मुलीची चुकूनही कधीं चौकशी करीत नसत. बाईनीं कशाचीच पर्वा केली नाहीं. त्यामुळें वडिलांची त्यांच्यावर खप्पा मर्जी झाली. अशा रीतीनें चारी बाजूंनीं प्रतिकूल परिस्थिति असतांना, त्यांनीं आपलें शिक्षण चालू ठेविलें. वर्गांत त्यांना एका बाजूला बसावें लागे. पण त्यांनीं कधींच वाईट

वाटून घेतले नाहीं. त्यांना आपलें ध्येय साधावयाचें होतें. त्यांच्या ठिकाणीं दुसरी एकादी बाई असती तर तिनें कंटाळून शिक्षणाला केव्हांच रामराम ठोकला असता. पण विधिसंकेत कांहीं निराळाच होता. ह्या बाईंकडून शिक्षणांत कांहीं तरी विशेष—जें कोणाला अद्याप साध्य झालें नाहीं—असें क्रांतिकारक स्थित्यंतर घडून यावयाचें होतें, म्हणूनच त्यांनीं सर्वांना धाब्यावर बसविलें.

इ. स. १८९६ सालीं म्हणजे वयाच्या सव्विसाव्या वर्षी रोम विश्वविद्यालयाची एम्. डी, ही अति उच्च अशी वैद्यकीची पदवी बाईंनीं संपादन केली. सर्व इटली देशांत अशी बहुमानाची पदवी मिळविणारी हीच पहिली विदुषी होय. यावेळीं मात्र टवाळी करणाऱ्या लोकांचे डोळे उघडले. बाईनीं आपल्या अपूर्व कर्तबगारीनें त्यांच्या डोळ्यांत चांगलेच अंजन घातलें. लोकांनीं टवाळी करण्याचें सोडून दिलें. टवाळीची जागा स्तुतीनें घेतली. इटलींतील सर्व वर्तमानपत्रांनीं व मासिकांनीं त्यांचे फोटो छापून स्तुति-सुमनें वाहिलीं.

वैद्यकीची अत्यंत मानाची एम्. डी. ची परीक्षा दिल्यानंतर वैद्यकीचा धंदा करावा असें मॉंटेसोरी बाईंना वाटेना. मानव जीवनाविषयीं कांहीं उपयुक्त ज्ञान मिळावें म्हणून त्या पुनः रोमच्या विश्वविद्यालयांत दाखल झाल्या व तेथे त्यांनीं आणखी चार वर्षे तत्त्वज्ञानाचा व मानस· शास्त्राचा कसोशीनें अभ्यास केला. त्यावेळीं शास्त्रज्ञ मंडळी साहित्य विशारदांनां कशी लाखोली वाहत असत व उलटपक्षी हे साहित्याचार्य शास्त्रज्ञांची कशी हजेरी घेत हें बाईंनीं प्रत्यक्षच अनुभविलें, आणि त्यामुळें ज्या दिवशीं साहित्य व शास्त्र यांचा मिलाफ करून दाखविणारी एकादी व्यक्ति या पृथ्वीवर अवतरेल तो सुदिन होय असें त्यांना वाटूं लागलें. तथापि येणेंप्रमाणें मानवी जीवन व शास्त्र यांचा गोड मिलाफ

करून दाखविण्याचें श्रेय मादाम मॉंटेसोरींनाच मिळालें आहे हें त्यांच्या शिक्षण पद्धतीवरून आपल्याला दिसून येतें.

स्त्रियांच्या चळवळींत लहानपणापासून म्हणजे विद्यार्थीदशेंत असल्यापासूनच त्या भाग घेत. वैद्यकीची पदवी मिळाल्यानंतर लवकरच बर्लिन शहरांत महिला परिषद भरली. त्या परिषदेंत रोमच्या प्रतिनिधि म्हणून मादाम उपस्थित राहिल्या. त्यावेळीं बाईंचें वक्तृत्व, विचार मुद्देसूद मांडण्यांची धाटणी व व्यक्तिमत्व यांचा सुपरिणाम त्या परिषदेवर झाला. त्यांच्या या गुणांमुळेंच बर्लिनच्या वृत्तपत्रांनीं त्यांना **सूर्यकिरण** Sonnen strahl ही पदवी बहाल केली. बर्लिनहून मायभूमीला परत आल्यावर, रोममधील एका सार्वजनिक रुग्णालयांतील रिकाम्या झालेल्या जागीं त्यांची निवड झाली. त्यावेळीं अशी बहुमानाची जागा मिळवणारी ईटालींतच नव्हे, तर साऱ्या यूरपखंडांत हीच पहिली महिला होय.

याच सुमारास ऑस्ट्रियन साम्राज्ञी एलिझाबेथ यांचा खून एका माथेफिरूनें केला. त्यावेळीं बाईनीं आपल्या डॉक्टर सहकाऱ्यांना सडेतोड सांगितलें कीं "तिचा खून तुम्हीच केला." त्यांच्या या बोलण्यामुळें खळबळ उडून, त्यांच्या या बोलण्याचे मथळे मोठ्या टाइपामध्यें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले. त्याचा परिणाम असा झाला कीं, इटलींत मंद बुद्धीच्या व वाममार्गी बालकांसाठीं अनेक संस्था निघाल्या व त्या संस्थांची मुख्य संचालिका म्हणून बाईंची नेमणूक झाली. लंडनमध्यें १९०० सालीं महिला परिषद भरली. त्या त्या परिषदेंत इटालियन स्त्रियांच्या प्रतिनिधि या नात्यानें बाई उपस्थित राहिल्या असतां, महाराणी व्हिटोरिया यांनीं त्यांचें मनःपूर्वक स्वागत केलें.

वैद्यकीची पदवी संपादन केल्यावर बाईंनीं आपल्या धंद्यास सुरवात केली. त्यांच्याकडे अनेक प्रकारचे रोगी येत. तसेंच अनेक विकृति असलेलीं बालकेंहि येत. बालकांच्या या मनोविकृतींकडे पाहून बाईंचें मन फार

कळवळें. त्यामुळें बालकांबद्दल त्यांना विशेष असें कांहीं तरी वाटूं लागलें. त्यांच्यासाठीं आतांपर्यंत कोणी केलें नाहीं, असें आपण कांहीं तरी करून दाखवावें असें बाईंना वाटूं लागलें. त्यांनीं बालकांसाठीं आपलें सर्वस्व अर्पण करण्याचें ठरविलें.

इटालीमध्यें वैद्यकीय व शिक्षणशास्त्रज्ञ यांची परिषद भरली असतां मादामनीं त्यावेळीं असें सिद्ध केलें कीं, मानसिक दृष्ट्या अधू असलेल्या बालकांना सुधारण्यासाठीं केवळ वैद्यकीय पद्धति अपुरी आहे. त्यांना सुधारण्यासाठीं मानसशास्त्रदृष्ट्याच शिक्षण दिलें गेलें पाहिजे. हें मादामचें म्हणणें इटालीच्या शिक्षण-मंत्र्यानें कबूल केलें. मादाम मॉंटेसोरींनीं अधू बालकांना शिकविण्यासाठीं नुसते वाकबगार शिक्षकच तयार केले नसून स्वतःच आपल्या शिरावर अशा तऱ्हेच्या बालकांना शिकविण्याचें काम घेतलें, आणि पुढें असें आढळून आलें कीं, सार्वजनिक परीक्षांमध्यें बाईंनीं तयार केलेलीं बालकें इतर बालकांपेक्षा अधिक सरस ठरलीं.

मादाम सुरवातीस मानसिक दृष्ट्या अधू बालकांचें अवलोकन करूं लागल्या. अशा प्रकारचें अवलोकन करण्यांत त्यांनीं बराच अवधी घालविला. नंतर खूप विचार करून बालकांच्या मानसिक विकृति घालविण्यासाठीं विशिष्ट प्रकारचें साहित्य तयार केलें आणि त्या साहित्याचा उपयोग मानसिक दृष्ट्या विकृत असलेल्या बालकांकडून करवून घेऊन त्यांच्या शिक्षणास सुरवात केली. त्याचा परिणाम मानसिक दृष्ट्या अधू बालकांवर चांगला झाला.

मानसीक दृष्ट्या अधू बालकांवर या साहित्याचा इतका चांगला परिणाम घडून येतो, तर हें साहित्य सर्व सामान्य बालकांना दिल्यास त्याचा किती मोठा परिणाम होईल हे विचार बाईंच्या मनांत घोळूं

लागले. त्यांनीं आपल्या वैद्यकीय पेशाला फाटा देऊन १९०६ साली जानेवारीच्या सहा तारखेला पहिलें बालक मंदिर सुरू केलें.

बाईंनीं ज्यावेळीं आपला वैद्यकीचा पेशा बंद करून बालकांसाठीं आपलें सर्वस्व अर्पण करण्याचें ठरविलें, त्यावेळीं पुष्कळांनीं त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण अज्ञान बालकांची करुण किंकाळी त्यांच्या हृदयापर्यंत पोंचली असल्यामुळें त्यांनीं आपला मार्ग सोडला नाहीं. त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न त्यावेळच्या शिक्षणमंत्र्यानेंही केला पण तोसुद्धां फोल ठरला. त्यांनीं बाईंना विचारलें, "तुम्हीं उत्तम प्रकारें चालत असलेल्या वैद्यकी पेशाला फाटा देऊन व मिळत असलेल्या मानमरातबेवर लाथ मारून, बालकांच्या आणि तेंही अगदींच लहान बालकांच्या शिक्षिकेचें हलक्या दर्जाचें काम करणार काय?" त्यावेळीं त्यांनीं सर्व स्त्रीजातीलाही थोडा दोष दिला. त्यावेळीं बाईंनीं गंभीरपणें उत्तर दिलें, "सध्यां जो मान मला मिळत आहे, त्यापेक्षां अधिक मान मिळून सर्व जग माझा उदोउदो करील!" आपण त्यावेळीं दिलेल्या उत्तराचें बाईंना फार आश्चर्य वाटत होतें. पण एवढें मात्र खरें कीं, त्यावेळीं त्यांनीं दिलेलें उत्तर आज अक्षरशः खरें झालें आहे.

**बालकांची नवी शिक्षण पद्धति** शोधून काढीत असतां, त्यांना तत्त्वज्ञान, जीवनशास्त्र, मानवशास्त्र, बालविज्ञान व विश्वप्रेम या गोष्टींचा अतिशय फायदा झाला यांत शंका नाहीं. डॉ. मॉंटेसोरी बाईंनीं १९०९ सालीं प्रथम लंडन शहरीं शिक्षणांतील तज्ञ व मानसशास्त्रज्ञ यांच्या-समोर आपलीं व्याख्यानें इटालीयन भाषेंत दिलीं. त्यांच्या प्रत्येक वाक्याचे भाषांतर लागलीच इंग्रजींत केले गेल्यामुळें तेथील सभाजनांस त्यांचें म्हणणें पूर्णपणें समजून आलें व तेंव्हांपासून त्यांच्या शिक्षण

पद्धतिविषयीं इंग्रज लोकांत जिज्ञासा उत्पन्न होऊन इंग्लंडमधूनच या पद्धतीचा साऱ्या जगभर प्रसार झाला.

या त्यांच्या व्याख्यानामध्यें त्यांनीं आपल्या श्रोत्यांच्या मनावर जी गोष्ट प्रामुख्यानें बिंबविली ती अशी होती कीं, आधुनिक शाळांमध्यें बालकांच्या उन्नतिविषयीं नाना तऱ्हांचें प्रयत्न केल्याचें सांगण्यांत येतें. पण प्रत्यक्ष कृति पहावी तर अनुभव मात्र निराळा येतो. बालकांच्या स्वतंत्र वृत्तीला आळा घालण्याकडेच या शाळांची प्रवृत्ति असलेली दिसून येते. परंतु त्यांच्या उत्साहाला व धांवरेपणाला योग्य वळण व शिस्त लावणें हाच शिक्षणाचा मुख्य हेतु असला पाहिजे असा मॉंटेसोरी शिक्षण पद्धतीचा मुख्य हेतु आहे. "हें करूं नको, याला हात लावूं नको, स्वस्थ बैस पाहूं." अशा तऱ्हेच्या शेलक्या प्रयोगांनीं मुलांना स्वस्थ बसविल्यानंतर त्यांच्या बुद्धीचा विकास व्हावा तरी कसा? असा मॉंटेसोरीबाईचा जगाला सवाल आहे. तसेंच त्या म्हणतात कीं, मूल स्वभावानें सर्व साधारण असेल तर त्याचें मन एकाग्र होण्यास अडचण पडत नाहीं; परंतु तेंच जर अधू म्हणजे लोक-विलक्षण अथवा असाधारण असेल तर त्याचें चित्त एकाग्र होत नाहीं व लक्ष कशांतच लागत नाहीं. त्यामुळें अशा बालकांना फार वेळ एके ठिकाणीं बसण्याचा प्रसंग आल्यास तीं अतिशय कंटाळतात. उलटपक्षीं सर्वसाधारण स्वभावाच्या म्हणजे कामामध्ये एकाग्र चित्तानें गढून जाणाऱ्या बालकांना कंटाळा न येतां त्यांचा उत्साह एकसारखा वाढतच जातो, असा बाईचा अनुभव आहे. हा अनुभव म्हणजेच मॉंटेसोरी शिक्षण विषयक तत्त्वज्ञानाचा मूलभूत पाया होय. मॉंटेसोरी पद्धतीनें शिकलेलीं बालकें व इतर पद्धतीनें शिकलेलीं बालकें यामध्यें एक मोठा फरक दिसून येतो तो हा कीं, शाळेची मधली सुटी झाली म्हणजे

इतर शाळांतील बालक उगाच आरडाओरडा करीत सुटतात; तर मॉंटेसोरी शाळेंतील बालकें शांत व आनंदी दिसतात. शांतवृत्ति म्हणजेच मानसिक समाधानाचें व आनंदाचें व्यक्त स्वरूप होय. शाळेंतील शिस्त पाहावयाची असेल तर मॉंटेसोरी शाळांत जाऊन पाहावें म्हणजे शिस्त, शांतवृत्ति व आनंदी स्वभाव ही काय असतात तें स्पष्टपणें पाहावयास सांपडेल. अर्थात् ही शिस्त कांहीं जुन्या पद्धतीच्या जबरदस्तीनें त्यांच्यावर लादलेली नसते हें तेव्हांच दिसून येईल. बाहेरील दबावानें शिस्त राखली जाते ही गोष्ट जर्मनीच्या बालोद्यान पद्धतीच्या उदाहरणावरून आपणांस दिसून येते. परंतु आजकालच्या सुधारलेल्या जगांत अशा तऱ्हेची बाह्यात्कारी लष्करी शिस्त फारशी उपयोगी पडेल असें वाटत नाहीं. पूर्ण स्वातंत्र्य देऊनसुद्धां विलक्षण शिस्त साधतां येते, हें डॉ. मॉंटेसोरींच्या कोणत्याहि शाळेंत बालकें केवळ स्वेच्छेनें आपापल्या कामांत अत्यंत गढून गेलेलीं आढळून येतात, या वरून तेथें शांततेचें साम्राज्य स्वाभाविकपणें प्रस्थापित झालेलें दिसून येतें.

याच सुमारास म्हणजे १९०६ सालीं एक विलक्षण घटना घडून आली. रोम शहराच्या आसपास वाढत्या लोकसंख्येला राहण्यासाठीं एका इंजिनीअरिंग कंपनीनें इमारत बांधावयास सुरवात केली होती. पण आर्थिक अडचणीमुळें कंपनीला तें काम अर्धवट सोडावें लागलें. त्या अर्धवट बांधलेल्या इमारतीचा उपयोग दारुडे, चोर यांच्यासारखे गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक करूं लागले. त्यामुळें त्या जागेविषयीं लोकमत वाईट बनलें.

पुढें दुसऱ्या एका इंजिनिअरिंग कंपनीनें तें अपुरें राहिलेलें काम पुरें केलें. परंतु मध्यंतरी त्या इमारतींत वाईट लोकांची वस्ती असल्या-

मुळें चांगले लोक तेथे राहावयास येईनात. शेवटीं कंपनीनें ती जागा मजूर लोकांना भाड्यानें दिली. हे मजूर लोक तरुण मुलगे व मुली (स्त्रिया व पुरुष) दिवसा कामाला जात. घरांत फक्त लहान बालकें असत. बालस्वभावाला अनुसरून तीं बालकें, रेघोट्या ओढून चित्रें काढून इमारतीची खराबी करूं लागलीं. यावर कोणता उपाय योजावा असा मालकांच्या डोक्यांत विचार आला. लहान बालकांच्या शिक्षणाचें कार्य करणाऱ्या मॉंटेसोरीबाईंचे नांव मालकांच्या कानावर गेले होते आणि म्हणून त्यांनी बाईंकडे धांव घेतली. त्यावेळीं बाई फार उद्योगांत होत्या. रोज जाऊन त्या बालकांकडे लक्ष देणें त्यांना शक्य नव्हतें. पण कार्याचें महत्त्व जाणून त्यांनी या कामी लक्ष घालायचें ठरविलें. "तुमच्या वस्तींतील, त्यातल्या त्यांत अधिक शिकलेली एकादी बाई व एक-दोन खोल्या देत असाल तर मी प्रयत्न करून पाहीन," असें बाईंनीं आश्वासन दिलें. अशा रीतीनें त्या इमारतींत पहिले बालक मंदिर सुरूं झालें. मनानें अधू अशा बालकांसाठीं वापरल्या जाणाऱ्या साहित्याचा बाईंनी या बालक मंदिरांत उपयोग केला. बाई आठवड्यांतून एक-दोन वेळां या बालक मंदिरांत जाऊन, त्या शिक्षिकेला मार्गदर्शन करीत. पांच-सहा महिन्यांत त्या बालकांच्या वागण्यांत, आचारांत व विचारांत खूप सुधारणा दिसून आली. आपल्या आई-बापांना विशेषतः आयांना ती बालके स्वच्छतेचे धडे देऊं लागलीं. पुढें कामाच्या व्यापा-मुळें हें काम सोडावें असा विचार बाईंच्या मनांत आला. ही गोष्ट जेव्हां त्या बालकांच्या आयांना समजली तेव्हां "आपण हें काम सोडूं नये" असा हट्ट त्या आयांनीं बाईंकडे धरला, आणि बाईंनीं तो त्या आयांचा हट्ट पुरविला.

या अल्पावधींत बालकांच्या अंगीं असणाऱ्या नैसर्गिक प्रवृत्ति अधिक

स्पष्टपणें बाईंच्या नजरेला दिसून आल्या आणि त्यांच्या आंतल्या आवाजानें त्यांना **हेंच आतां तुझ्या आयुष्यांतलें कार्य आहे** असा आदेश दिला. अर्थात त्यांनी आपले बाकीचे व्यवसाय आवरते घेऊन तेंव्हांपासून या एकाच क्षेत्रांत आपलें आयुष्य घालविण्याचा निर्धार केला.

बाईंच्या बालक–मंदिरांतील बालकांची कीर्ति सर्व जगभर पसरली. अनेक देशांतील वृत्तपत्रांतून त्यांच्याविषयीं लेख लिहिले गेले, बालक मंदिरांतील दृश्यांचे फोटोही प्रसिद्ध केले गेले. ते वाचून व पाहून अनेक देशांतील शिक्षणशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ व शिक्षणप्रेमी लोक येऊन आपापली खात्री करून घेऊं लागले. लोकांनीं आपली स्तुति करावी असें बाईंना चुकूनहि कधीं वाटलें नाहीं. त्यानंतर थोड्याच अवधींत अनेक संस्थांनी बालक मंदिरें उघडलीं. मिलान शहरांतल्या ह्युमॅनेटे-रिया भागांत समाजवादी पक्षानें एक बालक मंदिर सुरू केलें व मेसिना शहरांतल्या धरणीकंपांत सांपडलेल्या अनाथ बालकांसाठीं रोम शहरात कॅथलिक पंथाच्या भगिनींनी दुसरें बालक मंदिर उघडलें. याच दरम्यान मिलान शहरांतल्या ह्युमॅनेटेरिया या भागांत मॉंटेसोरी शिक्षण-पद्धतीचें साहित्य तयार करण्याचें केंद्र सुरू करण्यांत आलें.

एक त्यांनी स्वतः त्यांच्या पुण्याच्या मुक्कामात आम्हाला सांगितलेली गोष्ट मी येथे मुद्दाम सांगत आहे. आणि तो शिक्षणशास्त्रातील एक अत्यंत उच्च कोटीचा प्रयोग असल्यामुळे मी तिचा तेंव्हांपासून माझ्या शाळांतून व कॉलेजातून यशस्वीरीत्या प्रयोग करीत आलो आहे.

आणि तो मादामांचा प्रयोग असा. त्या बार्सिलोना येथे आल्या तेंव्हां त्यांना इटालियन शिवाय दुसरी कोणतीच भाषा येत नव्हती. पण स्पॅनिश भाषा शिकल्याशिवाय स्पॅनिश शिक्षण तज्ज्ञांच्या पुढें

आपल्या शिक्षणपद्धतीवर व्याख्यान देणे त्यांना शक्यच नव्हते. म्हणून त्यांनी स्पॅनिश भाषा शिकण्याचा स्वतःच एक अभिनय प्रयोग केला. त्यांनी एक ५०० पानाची स्पॅनिश भाषेतील कादंबरी विकत घेतली. इटालियन स्पॅनिश, पोर्तुगीज व फ्रेंच या भाषा लॅटिनोद्भव असल्यानें त्यांना स्पॅनिश शिकणें मुळीच कठीण गेले नाहीं, एवढेच नव्हे तर त्यांच्या या अभिनव प्रयोगानें त्यांना फार लवकर यश मिळाले. आणि तो प्रयोग म्हणजे : एक पान वाचायचे, दोन चार वेळा वाचायचे, सबंध अर्थ समजो वा न समजो ते संबध पान आपल्या वहीत एकेक वाक्य वाचून, तें पूर्णपणें ध्यनांत ठेवून स्वहस्तानें तें लिहून काढायचें. हा त्यांचा प्रयोग एवढा प्रभावी ठरला कीं दोन महिन्याच्या आंत त्यांना स्पॅनिश भाषा उत्तम येऊ लागली. त्याला सभोंवारचें वातावरण व मादामची तीव्र बुद्धी यांचीही जोड होती हें आपण विसरता कामा नये. मी हा प्रयोग अत्यंत यशस्वीरीतीनें माझ्या कॉलेजात चालू ठेवला आहे.

मॉंटेसोरी पद्धतीविषयीं पुस्तकें लिहिण्यास लोकांनीं बाईना विनंति केली. "मॉंटेसोरी शिक्षणपद्धति" ( Montessori Method ) या नांवाचें मोठें पुस्तक बाईनीं अवघ्या पंधरा दिवसांत लिहून पुरें केलें. या पुस्तकांत बालकांचें शिक्षण सशास्त्र पद्धतीनें कसें व्हावें याविषयीं भरपूर विवरण केलेलें आहे. या पुस्तकाचें भाषांतर मूळ इटालियन भाषेंतून स्पॅनिश, फ्रेंच, इंग्लिश, पोलिश, जर्मन, डेनिश, रशियन, पोर्तुगीज, झेकोस्लोव्हाकियन, हंगेरियन, रुमेनियन, अरबी, चिनी, जपानी, डच, ग्रीक, गुजराथी, मराठी इत्यादि अनेक भाषांतून झालें आहे. त्याशिवाय बाईचीं "The Discovery of the Child" ( मॉंटेसोरी शिक्षणपद्धति या पुस्तकाची सुधारून वाढविलेली नवी आवृत्ति )

"Education for the New World," "Secret of Childhood" इत्यादि पुस्तकें प्रसिद्ध असून, बाईनीं नुकतेच "Absorbent Mind" ( शोषक मन ) नांवाचें अत्यंत उपयुक्त पुस्तक लिहिलें आहे.

कांहीं लोकांनीं मॉंटेसोरी शिक्षपद्धतीचे शिक्षक तयार करण्यासाठीं वर्ग उघडण्याविषयी त्यांना विनंती केली. लोकांची मॉंटेसोरी शिक्षणपद्धती विषयी आस्था पाहून बाईना फार आनंद झाला. त्यांनीं १९१० सालीं इटलीतील उंब्रिया शहरीं मॉंटेसोरी पद्धतीचा पहिला वर्ग उघडला. या पहिल्या वर्गांत अमेरिका, दक्षिण आफ्रिका वगैरे अनेक दूरच्या देशांतून कित्येक लोक आले होते.

यानंतर अनेक वर्ग निघाले. अनेक राष्ट्रीय संस्था स्थापन झाल्या. अशा रीतीनें आपल्या शिक्षण कार्याची बाईनीं मिळविलेली प्रधानकी अद्याप कायम आहे व पुढेंहि अनंत काळ ती कायम टिकेल. यांत शंकाच नाही. बाईनीं लाविलेल्या बीजापोटीं सर्व जगभर उत्तम फळे लागलीं. ते आढळून येत आहे. या वृक्षाच्या अनेक शाखा निघाल्या. त्या सर्व एकत्रित आण्यासाठीं **नवशिक्षण संघ** The New Education Fellowship या संस्थेची स्थापना झाली.

एवढ्यांतच पहिलें जागतिक युद्ध सुरू झाले. त्याचा परिणाम बाईंच्या इटलींतील संस्थेवर होऊन ती बंद पडली. त्यामुळें अर्थातच बाईना इटली देश सोडावा लागला. त्यानंतर बाई अमेरिकेंत गेल्या. न्यूयॉर्कला मॉंटेसोरी शिक्षणाचें महाविद्यालय स्थापून ते **मिस पार्कहर्स्ट** यांच्या स्वाधीन केलें, पण लवकरच कांहीं मतभेदामुळें ही संस्था बाई-पासून निराळी झाली. त्यामुळें बाई स्पेनला गेल्या. बार्सिलोना येथें प्रयोगशाळा व विद्यालय स्थापन केलें. लढाई सुरू असेपर्यंत बाई हेंच काम करीत होत्या. पण लवकरच हे महायुद्ध संपताच तह झाला.

काटालानमधल्या अधिकारी वर्गांत राष्ट्राभिमान जागृत झाला व त्यांनीं बाईंना सांगितलें, "ही संस्था फक्त काटालान लोकांनींच चालवावी." अर्थात् बाईंना हें सहन झालें नाहीं. त्या तेथून निघाल्या व इंग्लंडला गेल्या. त्या ठिकाणीं कांहीं काळ प्रचार करून बाई परत १९२२ त इटलीला आल्या. १९२६ सालीं मॉंटेसोरी पद्धतीचें रॉयल स्कूल नांवाची संस्था स्थापन केली. पण तीहि बंद पडल्यामुळें बाई स्पेनला गेल्या. तेथें त्यांनीं खासगी संस्था स्थापन केली. ही संस्था स्थापन होऊन थोडे दिवस झाले नाहींत तोंच यादवी युद्ध सुरू झालें. बाई पुन्हां इंग्लंडला आल्या. तेथें शिक्षकांसाठी अनेक वर्ग सुरू केले. आंतरराष्ट्रीय परिषदाहि भरविल्या. अशाप्रकारें संस्थेला चिरस्वरूप प्राप्त करण्याचे प्रयत्न चालू असतांनाच लढाई सुरू झाली. त्यामुळें बाईंना इंग्लंड सोडून हॉलंडला जावें लागलें. तेथें ऑम्स्टरडॅम् येथें त्यांनीं एक संस्था स्थापन केली. ती आजतागायत मिसेस यूस्टन मि. ए. एम्. यूस्टन, मादम मॉंटेसोरींचे हिंदुस्थानांतील खास प्रतिनिधि, यांच्या मातोश्री या चालवीत आहेत. हल्लीं त्यांचें वय ८० वर्षांचें असून मादाम मॉंटेसोरी या त्यांच्या पाहुणी म्हणून त्यांच्या घरीं रहात असत. त्यांच्या, नेतृत्वाखालीं मॉंटेसोरी शिक्षणपद्धतीचें कार्य फार जोरांत चालू आहे.

ज्या ज्या ठिकाणीं मादाम गेल्या त्या त्या ठिकाणीं त्यांनी आपल्या शिक्षण पद्धतीचा प्रचार केला. अनेक संकटें सहन केलीं. पण प्रचार–कार्य थांबविलें नाहीं. त्यांच्या अनेक वर्गांत शेंकडो विद्यार्थी येत. बाईकडे बाल–शिक्षणाची दीक्षा घेत व शिक्षणाचें कार्य करीत. अनेक राष्ट्रांतील निरनिराळ्या पंथांचे लोक बाईंचे शिष्य बनले आहेत. त्यांनीं आपापल्या देशांत बाल–शिक्षणाची केंद्रें स्थापन केलीं आहेत. बाईचें जीवन एकाद्या मिशनऱ्यासारखें आहे. एका ठिकाणीं प्रचार झाला कीं,

त्यांना दुसरीकडे जावें लागे. त्यांनीं लाविलेलें रोपटें वाढत, फुलत आहे व फळें देत आहे. आतांपर्यंत झालेल्या बहुतेक संशोधकांच्या संशोधनाचें चीज सर्व जगाकडून त्यांच्या पश्चात होत आलें. परंतु बाईंच्या शैक्षणिक अपूर्व संशोधनाचें चीज सर्व जगाकडून त्यांच्या डोळ्यांदेखत होत आलें ही एक विशेष आनंददायक गोष्ट आहे.

हॉलंडहून बाई हिंदुस्तानांत आल्या. लवकरच नुकतेच शांत झालेले युद्ध १९३९ मध्यें सुरू झाले म्हणून बाईना व त्यांचे मानीव पुत्र मि. मारिओ मॉंटेसोरी यांना हिंदुस्तान सरकारनें स्थानबद्ध केलें. बाईंना



**मि. मारिओ मॉंटेसोरी**

प्रथम नीलगिरी पर्वतावरील कोडेकॅनाल या ठिकाणीं मि. मॉंटेसोरींपासून अलग ठेवण्यांत आलें. बाई त्या ठिकाणीं एकट्याच असत त्यामुळें त्यांना बोलण्याचालण्यासाठीं जवळचें असें दुसरें कोणी नव्हतें म्हणून त्यांनीं मि. मारिओ व आपण यांना एकत्र ठेवण्याविषयीं सरकारला सांगितलें. नंतर त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणें मद्रासजवळ अड्यारला म्हणजे मिसेस ॲनीबेझंट यांनीं स्थापन केलेल्या आश्रमांत ठेवण्यांत आलें. त्या ठिकाणीहि बाई मि. मॉंटेसोरीसह नजर कैदेंत होत्या. त्यांना एकटे असें बाहेर जातां येत नसे. बाहेर जावयाचें झाले तर सरकारी शिपाई बरोबर असत. मि. मॉंटेसेरींना तर राहत्या घराच्या कुंपणाबाहेरही जातांच येत नसे. अशी परिस्थिति असतांहि बाईंनीं तेथें शिक्षकांचा वर्ग सुरू केला. आपल्या प्रचार कार्यांत खंड पडूं दिला नाहीं. मि. मॉंटेसोरींच्या व कांहीं हिंदी विद्यार्थ्यांच्या मदतीनें बाईंनीं वर्ग सुरू केले. वर्गांसाठीं लागणारें साहित्य गोळा केलें. अशा कठीण परिस्थितींतहीं बाई त्या ठिकाणीं प्रचार कार्य करीत होत्या. नंतर लढाई थांबल्यावर त्यांच्यावरील बंदी हुकूम रद्द करण्यांत आला. आता बाई स्वतंत्र झाल्या होत्या. ठिकठिकाणीं फिरून त्यांनीं वर्ग सुरू लेले. अहमदाबाद, पुणें, कराची, वगैरे ठिकाणीं मिळून एकूण दहा वर्ग बाईनी भारतांत चालविले. त्यांच्याच प्रेरणेनें भारतामध्यें अनेक संस्था स्थापन झाल्या. मुख्य संस्था जयपूर स्टेटमधील पिलानीला आहे. मुंबई पुणें, कोल्हापूर, ग्वाल्हेर, अड्यार वगैरे ठिकाणी त्यांच्या संस्थेच्या शाखा आहेत पाकिस्तानमध्येंहि कराचीला एक वर्ग चालविला गेला. हा पाकिस्तानमधील पहिला वर्ग होय. तेथेंहि मॉंटेसोरी केंद्र स्थापन झालें आहे.

आतां बाईंची शिक्षण पद्धति विश्वविद्यालयाच्या शिक्षणक्षेत्रापर्यंत पुरी झालेली आहे. तरी देखील बाई म्हणत माझ्या “ कार्याला खरी सुरवात

आतां झाली आहे." मॉंटेसोरी शिक्षण पद्धति ही बालजगाला मिळालेली एक केवढी तरी मोठी देणगी आहे. मनुष्य प्राण्यांत जे दोष आढळतात त्यांचा समूळ नायनाट करायचा असेल तर त्याची बाल्यावस्थेपासूनच सेवा केली पाहिजे, कारण या बालकांतूनच मोठी माणसें निर्माण होतात. बालकांत जर दोष राहिले तर ते मोठेपणींहि तसेच राहातात. म्हणून सर्व मानव समाज जर सुधारायचा असेल तर बालकांकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे. त्यांना अगदी जवळून पाहिलें पाहिजे. बाईंच्या शाळेंतील बालकांचें दोष नाहींसे झालेले आहेत. बालकांचें समाजांतील स्थान समाजाला कळण्यासाठीं बालकांचा पक्ष स्थापन केला पाहिजे. बाईंनीं १९३९ मध्यें **कोपनहागन** येथें **बालपक्ष** स्थापन केला. त्यामुळे चारी बाजूस भयंकर वादळ माजलें. पण बाईंनी आपला मार्ग सोडला नाहीं.

आज समाजांत स्त्रियांची दुःस्थिति समाजापुढें मांडणारे स्त्रियांचे कैवारी दिसतात;—मजुरांचे हाल लोकांना पटवून देणारे समाजसत्तावादी दिसतात; पण बालकांच्या शिक्षणाच्या बाबतींत विशेष लक्ष घालणारे कितीसे दिसतात ? ज्यावेळीं बालकांची सेवा करणारे बाल-सेवक राष्ट्रांत निर्माण होतील त्याचवेळीं तें राष्ट्र जगाला आदर्शवत् वाटूं लागेल.

महायुद्ध संपल्यावर बाई मि. मारिओ मॉंटेसोरीसह युरोपला गेल्या. तेथें त्यांनीं लाविलेलें झाड टिकाव धरून राहिलेलें पाहून त्यांनीं आनंद व्यक्त केला. इंग्लंडमधल्या संस्थेनें आपलें कार्य चालू ठेविलें होतें. हॉलंड, फ्रान्, इटली, डेन्मार्क व जर्मनी या देशांत हें कार्य योग्यपणें चाललें होतें. ज्या ज्या ठिकाणीं बाई गेल्या, त्या त्या ठिकाणीं त्यांचें

स्वागतच झालें. बाई जेव्हां पॅरिसला गेल्या तेव्हां **प्रेसिडेंट लिऑं ब्लं** यांनीं त्यांचा बहुमान करून जाहीर सभेंत त्यांच्या गौरवपर भाषण केलें.

बाईंच्या कामगिरीचा गौरव सर्वांत अधिक इटलींत होणें रास्तच होतें. महायुद्धामुळें तेथील मॉंटेसोरी चळवळ विस्कळित अशी झाली होती. तिची पुनर्घटना करण्यासाठीं सरकारनें बाईंना व मि. मॉंटेसोरींना बोलाविलें. बाई मि. मॉंटेसोरींसह गेल्या, तेव्हां तेथल्या निरनिराळ्या मतांच्या सर्व वर्तमानपत्रांनीं बाईंची एकमुखानें स्तुति केली. अनेक वर्षांच्या हद्दपारीनंतर बाईंनी इटलींत पाऊल ठेविलें होतें. त्यामुळें त्यांचें राष्ट्राकडून अभिनंदन करण्यांत आलें.

आतां बाईंना सगळीकडून आमंत्रणें येऊं लागलीं. जर्मनीतील बर्लिन इत्यादि ठिकाणांहून आमंत्रणें आलीं. पण बाईंनीं इटलींत राहावें अशी तेथील लोकांनीं इच्छा प्रकट केली. परंतु बाईंनी हिंदुस्थानांत जाण्याचा विचार ज्यावेळीं सर्वांना सांगितला, त्यावेळीं पुष्कळांनीं त्यांना त्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण तो निष्फळ ठरला.

एक वर्षभर युरोपखंडांत राहून नंतर बाई हिंदुस्थानांत परत आल्या. त्यांनीं अगोदरच हिंदुस्थान व सिलोन येथें मॉंटेसोरी शिक्षण केंद्राच्या शाखा उघडल्या होत्या. पिलानी येथील मॉंटेसोरी केंद्रामार्फत **मॉंटेसोरी मॅगझिन** नांवाचें एक त्रैमासिक इंग्रजींत सुरू आहे. हिंदुस्थानांतील मॉंटेसोरी शिक्षण संस्थेचें नांव **असोसिएशन मॉंटेसोरी इन्टरनॅशनल ( इंडिया )** Association Montessori International ( India ) असें आहे. तिच्या शाखा मुंबई, पुणें, ग्वाल्हेर, कोल्हापूर, अड्यार वगैरे ठिकाणी आहेत. या सर्व शाखांमार्फत मॉंटेसोरी शिक्षण पद्धतीचा प्रचार करण्याचें कार्य चालू आहे.

हिन्दुस्तानांत सर्व संस्थांवर प्रमुख म्हणून काम करण्यासाठीं

मि. ए. एम्. यूस्टन यांची नेमणूक झाली आहे. मि. यूस्टन हे बाईंचे हिंदुस्तानांत व्यक्तिगत प्रतिनिधि आहेत.



मि. ए. एम्. यूस्टन

कराचीचा मॉंटेसोरी शिक्षण पद्धतीचा वर्ग सुरू करून बाई तारीख २३ एप्रिल १९४९ रोजीं मिस्टर व मिसेस मॉंटेसोरींसह हॉलंडला गेल्या.. तिकडे गेल्यावर तारीख २२ ते २९ ऑगस्टपर्यंत सान् रेमो ( इटली ) येथे आठवी मॉंटेसोरी आंतरराष्ट्रीय कॉंग्रेस भरली होती.

## सान् रेमोची कॉंग्रेस व नंतर

या शैक्षणिक कॉंग्रेससाठीं निरनिराळ्या २९ राष्ट्रांतील प्रतिनिधी

उपस्थित होते. डॉ. मॉंटेसोरी या हिंदुस्थानांतून परत आपल्या मायभूमीस पोचल्यापासून सर्व राष्ट्रभर अत्यंत औत्सुक्यानें व आनंदानें त्यांचा गौरव होऊं लागला. शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, समाज-कार्यकर्ते, जगभर शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी जगभर पसरलेल्या संस्थांचे प्रतिनिधी, डॉक्टर्स, समतावादी व शिक्षक साऱ्या इटलींतून व परदेशांतून ह्या महोत्सवांत अत्यंत हिरीरीनें व उत्साहाने भाग घेत होते. सान् रेमो हे अत्यंत सुंदर शहर समुद्रकांठीं वसलेले आहे. येथून बागांचें व समुद्रकांठचें दृश्य अत्यंत मनोहर दिसते. अशा उत्साहवर्धक शहरांतील म्युनिसिपल थिएटरमध्ये या कॉंग्रेसची सुरुवात झाली, त्यावेळी इटलीचे शिक्षण–मंत्री, पार्लमेंटचे कित्येक सभासद, हिज एक्सलन्सी व्हेंटी मिलियाचे बिशप, पोपचे प्रतिनिधि या नात्यानें, म्युनिसिपालिटीचा अधिकारी वर्ग, शिक्षण खात्याचे डायरेक्टर जनरल इत्यादि प्रतिनिधी उपस्थित होते. त्याचप्रमाणे ऑस्ट्रिया, चिली, ग्रीस, ग्वॉटेमाला, सिलोन, भारत, इराण, मेक्सिको, पनामा, स्वीडन व UNESCO युनेस्कोचे अधिकारी, प्रतिनिधी या नात्यानें बहुमानाची जागा भूषवित होते. निरनिराळ्या २९ राष्ट्रांतून प्रतिनिधी आले होते. त्यांची संखया सुमारें सातशें होती. ही कॉंग्रेस सुरू होण्याच्या अगोदर इटली देशाचे परराष्ट्र–मंत्री कौंट स्फोर्झा, सुप्रसिद्ध इंग्लिश लेखक आल्डुस हक्स्ले, त्याचप्रमाणे प्रिन्स धोनी, संरक्षण मंत्री आणि कित्येक परराष्ट्र--सेक्रेटरी व इटलींतील कित्येक परदेशस्थ संस्थांचे प्रतिनिधी यांच्याकडून अभिनंदन व गौरवपर संदेश आले होते.

इटलीचे शिक्षणमंत्री यांनीं आपल्या इटालियन सरकारच्या वतीने जाहीर केले कीं, ‘इटलींतील सारा सुशिक्षित वर्ग शिक्षणा-

धीकारी यांचा, सर्व जगांतील मानव जातींत शांतता व ऐक्य–भाव निर्माण करण्यासाठीं प्रामुख्यानें भाग घेणाऱ्या मॉंटेसोरी शिक्षणविषयक चळवळीला संपूर्ण पाठिंबा आहे. '

डॉ. मॉंटेसोरी यांच्या व्याख्यानाचा विषय **जगाच्या पुनर्रचनेसाठीं मानवाची घडण** असा अत्यंत महत्त्वपूर्ण होता. मादामनीं आपल्या या व्याख्यानांत मॉंटेसोरी शिक्षणपद्धतींतील कांहीं वैशिष्ट्यें यांवर भर देऊन अत्यंत विचारप्रवर्तक भाषण केलें व कॉंग्रेसची अशी खात्री पटविली कीं, भविष्यांत मानवी जीवन सुखमय होण्यासाठीं शास्त्रीय सिद्धांतांवर आधारलेली मॉंटेसोरी शिक्षणपद्धतीच मार्गदर्शक होईल. दुसरें दिवशीं मॉंटेसोरी शैक्षणिक प्रदर्शन भरविलें गेलें. त्यामध्यें सर्व जगभर मॉंटेसोरी शिक्षणपद्धतीचा विकास कसकसा होत गेला याचें अत्यंत आकर्षक रीतीनें दिग्दर्शन करण्यांत आलें. चित्रें, आलेख ( ग्राफ ), छायाचित्रें, मॉंटेसोरी साहित्य, तीन ते अठरा वर्षे वयाच्या मुलांनीं केलेल्या कामांचे नमुने, वीस निरनिराळ्या देशांतून आले होते. या प्रदर्शनांतील अत्यंत प्रेक्षणीय विभाग म्हणजे आलेल्या प्रतिनिधींना प्रत्यक्ष अवलोकन करण्यास योग्य अशी खरोखरीची मॉंटेसोरी शाळा तिथें भरविण्यांत आली होती. या ठिकाणी प्रतिनिधींना मॉंटेसोरी शिक्षणविषयक तत्त्वें प्रत्यक्ष उपयोगांत कशी आणली जातात व मॉंटेसोरी साहित्याचा उपयोग बालकें कशीं करतात हें प्रत्यक्षच पहावयास मिळालें. मॉंटेसोरी शिक्षणतज्ज्ञांनीं अनेक व्याख्यानें देऊन व प्रात्यक्षिकें दाखवून मॉंटेसोरी तत्त्वज्ञान जगभर कसें लोकप्रिय झालें आहे हें दाखविलें.

या कॉंग्रेसपुढें तज्ज्ञ प्रतिनिधीनीं तीस प्रबंध वाचले. त्यांतील प्रत्येक प्रबंध इतका महत्त्वपूर्ण व अधिकारवाणीनें लिहिला गेला होता कीं,

दा. क्र. १८७८९

तो पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यास साऱ्या जनतेला उपयुक्त होईल असें सर्वांना वाटलें. प्रो. बेनेर ( इंग्लंड ) डॉ. पिगनोको ( रोम ) यांचे प्रबंध विशेष उल्लेखनीय होते. तसेच युनेस्कोचे प्रतिनिधी मॉंस्यू मारो व रेव्हरंड फादर चेरेसी ( रोम ) यांनीं मॉंटेसोरी शिक्षणपद्धतींतील **धार्मिक शिक्षण** या विषयावर विशेष भर देऊन परिणामकारक भाषण केलें. राष्ट्रीय संशोधन कौंसिलचे अध्यक्ष प्रो. गुस्टोवा कोलोनेट्टी यांनी मॉंटेसोरी शिक्षणपद्धतींतील मानवता या विषयावर विशेष भर देऊन साऱ्या जगांतील शिक्षणपद्धती आमूलाग्र बदलावयाची असेल तर मॉंटेसोरी शिक्षणपद्धतीचाच अवलंब केला पाहिजे हें सप्रमाण सिद्ध केलें.

या कॉंग्रेसपुढें डॉ. मारिया मॉंटेसोरीनीं एकंदर चार व्याख्यानें देऊन त्यांत आपल्या शिक्षणपद्धतींतील प्रमुख तत्त्वें व त्यांचा भावी जगांत मानवता सुधारण्यासाठीं झालेला सुपरिणाण व त्यामुळें जगांतील संस्कृति सुधारून जगभर सौख्य, समाधान व शांति नांदू लागेल असें मोठ्या कळकळीनें सांगितलें.

येथें जमलेल्या प्रत्येक प्रतिनिधीनें व प्रेक्षकानें गेल्या चव्वेचाळीस वर्षांत मॉंटेसोरी बाईंनीं जगाची प्रगति व्हावी, जगांत सौख्य समाधान नांदावें यासाठीं जिवापाड मेहनत केली, आणि नाना तऱ्हेचे कष्टहि सहन केले, याबद्दल त्यांना नोबेल प्राईझ लवकर देण्यांत यावें असें मत व्यक्त केलें.

या कॉंग्रेसमध्ये प्रत्येक व्याखयात्यांच्या तोंडून एक अत्यंत महत्त्वपूर्ण गोष्ट बाहेर पडली ती ही कीं, जगांतील मानवता सुधारावयाची असेल तर प्रथम आपण हल्लींची शिक्षणपद्धति आमूलाग्र बदलली पाहिजे व ही शिक्षणपद्धति सुधारण्यांसाठीं मॉंटेसोरी शिक्षणपद्धतीचा उपयोग केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

\+ \+ \+

जगप्रसिद्ध शिक्षण तज्ञ या नात्यानें गौरव करण्यासाठीं डॉ. मारिया मॉंटेसोरींना पॅरिस येथून खास आमंत्रण देण्यांत आल्यामुळें त्या तेथें गेल्या. तेथें इटलीचे परराष्ट्र वकील, Desclee de Brouwer & Cie मादामचीं पुस्तकें फ्रेंच भाषेत प्रसिद्ध करणारी कंपनी वगैरे व्यक्ति व संस्था यांजकडून गौरव केला गेला. फ्रेंच सरकार व युनेस्को यांनीं त्यांना अत्यंत बहुमानाच्या दोन पदव्या बहाल केल्या. त्यांपैकीं पहिली Star of an Office of the Legion of Honour ही पदवी सोर-बोन् ( Sorbonne ) विश्वविद्यालयाच्या रेक्टरनीं फ्रेंच सरकारचे प्रतिनिधी या नात्यानें मादामना अर्पण केली. ही पदवी अर्पण करण्याच्या वेळीं त्यांनीं छोटे भाषण करून योग्य शब्दांत त्यांचा गौरव केला व इटालियन राष्ट्र व फ्रेंच राष्ट्र यांच्यामध्यें सांस्कृतिक दृढसंबंध घडून आल्याबद्दल अभिमान व्यक्त केला. त्याच दिवशीं युनेस्कोचे जनरल डिरेक्टर हिज एक्सलन्सी डॉ. टोरेस बोडे यांनीं मॉंटेसोरीबाईंना दुपारीं खाना दिला. त्यावेळीं भाषण करतांना ते म्हणाले, “ नूतन शिक्षणपद्धति या नांवानें प्रसिद्ध असलेल्या व जगांत शिक्षणपद्धतींत महत्त्वपूर्ण क्रांति घडवून आणणाऱ्या स्फूर्तिदायक मॉंटेसोरी शिक्षणपद्धतीच्या आद्यप्रवर्तक त्या नात्यानें मी त्यांना नतापूर्वक अभिवादन करतों. त्यांच्या शिक्षण-पद्धतींतील पहिलें महत्त्वपूर्ण तत्त्व म्हणजे विचारापूर्वी आचाराला महत्त्व असून आचारांतूनच विचार निर्माण झाला पाहिजे. यांतच त्यांच्या शिक्षणाची सारीं तत्त्वें समाविष्ट आहेत. त्यांनीं तयार केलेलीं शैक्षणिक उपकरणें वापरून बालक बुद्धिप्रधान काय करण्यास तत्पर होतें व त्याचमुळें भूमिति व तर्कशास्त्र यांची प्रेरणा बालकाच्या अंतःकरणांत आपोआपच होत जाते. शिक्षणपद्धतींतील मादामची अत्यंत महत्त्वपूर्ण भर म्हणजे, “ बालक हें ज्ञान ओतण्यासाठीं तयार केलेलें भांडें नसून

तें एक संपूर्ण मनुष्य असतें व त्याच्या निसर्गदत्त गुणांचा विकास करणें हेंच शिक्षकाचें खरें ध्येय आहे."

युनेस्कोच्या शिक्षण विभागांतर्फे डॉ. मॉंटेसोरीबाईना राष्ट्रांराष्ट्रांत सलोख्याचे संबंध कसे निर्माण करतां येतील असा एक महत्त्वपूर्ण प्रश्न विचारल्यावरून बाईंनीं खालील सहा मुद्दे त्यांच्यापुढें मांडले.—

( १ ) Formation of Man–बालक मानवीवृत्ति आनुवंशिकरीत्या मिळवीत नाहीं. हें सिद्ध करून, बालक स्वतः आपल्या अनुभावरून व आपल्या सभोंवारच्या वातावरणांतून ज्या ज्या गोष्टी त्याला शोषून घेतां येतील त्या त्या आत्मसात् करून भाषा, चाली–रीति, धर्म इत्यादि गोष्टींचें ज्ञान मिळवीत असतें. त्यासाठीं जगांतील शिक्षणविषयक नीति पुढील कलमांत दर्शविल्याप्रमाणें अनुसरली गेल्यास मानवाचा विकास होण्यास उपयोग होईल.

( अ ) मानवामानवांमध्ये व जातींजातींमध्यें जे जे कांहीं भेदभाव असतील ते कमी कमी करून त्यांच्यांत प्रेमभाव निर्माण व्हावा म्हणून बालकांभोंवतीं पोषक असें विशिष्ट वातावरण निर्माण करण्यांत आलें पाहिजे.

( ब ) बालक ज्वानीच्या ( Adolescene ) अवस्थेंत असतां मानव जातींतील निरनिराळ्या विशिष्ट जातींशीं त्यांचा संबंध घडवून आणण्या-साठीं निरनिराळे प्रसंग निर्माण केले म्हणजे सहकार्य व सहानुभूति ही त्यांच्यात आपोआप निर्माण होतील.

( २ ) भाषा :—परभाषेचे ज्ञान अधिक विस्तारानें दिलें गेलें पाहिजे व यासाठीं बालकांत वसत असलेल्या निसर्गदत्त गुणांचा म्हणजे परभाषा आत्मसात करण्याचा पूर्णपणें फायदा घेतला गेला पाहिजे. कारण या अल्पवयांत बालक अनायासें परभाषा आत्मसात करूं शकते.

(३) **शिक्षणामुळें कृतज्ञता निर्माण झाली पाहिजे** :—ज्या ज्या गोष्टींमुळें मानवाच्या उच्च संस्कृतीची घडण बनविली गेली त्या प्रत्येक गोष्टीबद्दल मानवाच्या अंतःकरणात कृतज्ञता निर्माण झाली पाहिजे; व ही कृतज्ञतेची भावना अल्पवयी बालकांच्या अंतःकरणांत पेरली गेली पाहिजे.

(४) **सामाजिक अर्थिकसंबंध** ( Social Economy ) :— लोकराज्याची खरी कल्पना येण्यासाठीं प्रत्येक व्यक्तीला त्याच्या आद्य कर्तव्याची जाणीव करून देणें आवश्यक आहे. उदाहरणार्थ—मनुष्य अशिक्षित असेल तर त्याला मतदानाचा अधिकार असता कामा नये. कारण तो चांगल्या वाईट परिणामाकडे लक्ष न देतां अनवधान वृत्तीनें आपलें मत देईल किंवा पैशाच्या लालचीनें व त्यामुळें जगांतील आर्थिक एकतानतेंत बिघाड उत्पन्न होईल. यासाठीं ज्या राष्ट्रांतील जनता अप्रबुद्ध स्थितीत असेल, त्यांना आरंभापासूनच लोकराज्य मतदानाचें महत्त्व इत्यादि गोष्टींविषयीं शिक्षण दिलें गेलें पाहिजे.

(५) **विश्वविषयक शिक्षण** :—सांस्कृतिक शिक्षणाचा शास्त्रीय पाया सहकार्यावर अवलंबून ठेविल्यास विश्वांतील दरेक शक्ति व जीवनाचा दरेक प्रकार यांच्यामध्यें एकतानता निर्माण करणें शक्य होईल. याच तत्त्वानुसार इतिहास शिकविला जावा. म्हणजे जगांत वेगवेगळ्या संस्कृति कशा निर्माण झाल्या व कालमानपरत्वें त्यांच्यामध्यें विलक्षण फरक दिसून येत असला तरी सहानुभूतीनें त्याचा अभ्यास केल्यास सहकारिता आपोआपच उत्पन्न होईल. असें झाल्यास जगांत ऐक्य निर्माण होण्यास फार मदत होईल. म्हणून शिक्षणामध्यें सहकारितेला अत्यंत महत्त्व आहे.

(६) **बालक व जागतिक शांतता**—जगांत शांतता प्रस्थापित

करण्यासाठीं बालकाच्या शोषक मनाच्या अचाट शक्तीचा आपल्याला उपयोग करून घेतां येईल. या शक्तीमुळें बालकाला विवक्षित वृत्ति धारण करणें शक्य आहे. या शक्तीचा शास्त्रीय दृष्ट्या शिक्षणाच्या कामांत उपयोग करून घेतल्यास जागतिक शांतता प्रस्थापित करण्यास फार मदत होईल व त्यायोगें भावी समाजांत एकतानता निर्माण होईल.

## असोसिएशन मॉंटेसोरी इन्टरनॅशनल, हिन्दुस्तान विभाग

डॉ. मारिया मॉंटेसोरी यांची शिक्षण पद्धति आतां सर्व जगाला माहीत झालेली आहे. जगाच्या पाठीवर असा एकहि देश नाहीं कीं, ज्या ठिकाणी या पद्धतीविषयीं कांहीं ना कांहीं माहिती नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें मॉंटेसोरी बाईच्या एकूण एक पुस्तकांचें भाषांतर जगांतील साऱ्या प्रमुख भाषांतून झालेलें आहे. त्यावरून त्यांचें तत्त्वज्ञान व विचार पद्धति जगापुढें स्पष्टपणें मांडली गेली आहे. जगाच्या अगदीं अज्ञात भागांतसुद्धां म्हणजे कॉंगो, नायजेरिया, युगांडा, केनीया, आइसलंड आणि तिबेट या देशांतसुद्धां मॉंटेसोरी पद्धतीचा प्रचार झालेला आहे.

मॉंटेसोरी पद्धतीची कळकळ केवळ शिक्षणतज्ञ व आई-बाप यांच्यामध्येंच सामावलेली नसून सरकार, नगरपालिका व खासगी संस्था यांच्याकडून मॉंटेसोरी अध्यापन विद्यालयें स्थापन करण्यांत आलेली आहेत व निरनिराळ्या ठिकाणीं मॉंटेसोरी संस्था स्थापन होऊन त्यांच्याकडून मॉंटेसोरीं शाळा चालविल्या जात आहेत. गेल्या पन्नास वर्षांच्या अनुभवावरून असें सिद्ध झालें आहे कीं, मॉंटेसोरी पद्धतीमुळें बालकांची जवळ जवळ अध्ययनाचीं दोन वर्षे वाचतात. आरंभापासून वाचनाची गोडी, काम करण्याची प्रवृत्ति, व हौस मन एकाग्र होण्याची वृत्ति व उत्साहानें काम करण्याकडे कल हे गुण त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेले आढळून येतात.

## शिक्षणविषयक क्रांति

माँटेसोरी शिक्षण पद्धतीमुळें शिक्षणांत विलक्षण क्रांति घडून आली आहे. उदाहरणार्थ-बालकांना स्वतंत्र वातावरणांत काम करण्याची पूर्ण मुभा असल्यामुळें त्यांच्या स्वभावांतच फरक घडून आलेला दिसतो. आरंभीं आरंभीं युरोपभर मुलें गलिच्छ भागांतून बालक मंदिरांत येत असल्यामुळें तीं घाबरट, दुर्मुखलेलीं, हिंसावृत्तीची, अस्थिर मनाची, आज्ञा मोडणारी व नेहमीं भांडणास प्रवृत असणारीं अशीं असत. पण थोड्या महिन्यांच्या अवधींतच या बालकांची वृत्ति अजिबात बदलून जाऊन त्यांच्या वृत्तींत सभ्यपणा, शांतवृत्ति इत्यादि सद्गुण निर्माण झालेले आढळून येऊं लागले. हातीं लागलेल्या जिनसा फोडून-तोडून फेंकून देण्याकडे व प्रत्येक जिन्नस आपल्यालाच हवी या त्यांच्या अवगुणांमध्यें एकदम फरक झालेला आढळून आला व हीं बालकें एकमेकांशीं गुद्दागुद्दी न करतां प्रेम भावानें वागूं लागलेलीं दिसून आलीं. त्यांच्या भावनावृत्तींत एक प्रकारचा कोमलपणा आलेला दिसून आला. या बालकांना दुसऱ्यांचीं दुःखें व अडचणी समजून येऊं लागल्या व त्यांचें अंतःकरण आपल्या सवंगड्याच्या सुखःदुःखाशी समरस होण्यास प्रवृत्त झाले. त्याचप्रमाणें बालकांचा एकदम संताप व आईबापांशी उद्धटपणानें वागण्यांत येत असलेला दुर्गुण नाहींसा होऊन, त्याऐवजी आज्ञाधारक वृत्ति व प्रेमळपणा अधिक आढळून येऊं लागला. बालकांच्या या गुणांमुळे त्यांच्यामध्यें सहकार्याची वृत्ति अधिक प्रमाणांत आढळून येऊं लागली. या सर्व गुणांचें श्रेय बालक मंदिरांनाच देणें इष्ट आहे.

प्रत्येक बालकाच्या अंतःकरणांत व वृत्तींत अशा तऱ्हेचा क्रांतिकारक फरक घडून आल्यावर त्यांचीं मनें आपोआपच एखादें कार्य करण्याकडे

वळूं लागलीं व तें कार्य संपूर्ण झाल्याचा आनंद त्यांना अनुभवितां येऊं लागला, हें त्यांच्या वृत्तीवरून दिसून येऊं लागलें. यावरून आई-बापांना असें वाटूं लागलें कीं, हा जो अद्भुत चमत्कार आपल्या उद्धट वृत्तीच्या बालकांमध्यें घडून आला हें सारें मॉंटेसोरी बाईच्या शाळेंतील बदललेल्या वातावरणामुळेंच होय यांत शंका नाहीं.

आणखी एक गोष्ट मादाम मॉंटेसोरींच्या नजरेला विशेषतः आली ती ही कीं, जरी बालकें बालकमंदिरांमध्यें अत्यंत सौम्यपणानें, सभ्य वृत्तीनें व सहकारितेनें एकमेकांशी व शिक्षकांशी वागत असलीं, तरी घरीं गेल्याबरोबर त्यांची अंतस्थ पशुवृत्ति पुनः जागृत होत असे व घरच्या वातावरणामुळें त्यांच्या उद्धट पणास अधिक वाव मिळत असे. हें असें कां व्हावें याचें संशोधन करण्यास मादाम मॉंटेसोरींनीं सुरवात केली. होय ! बालकें घरीं गेल्याबरोबर उद्धटपणानें वागतात यांत मुळींच शंका नाहीं. तीं आईबापांना दुरुत्तरें करतात, त्यांच्या आज्ञा मोडतात. यःकश्चित् कारणांवरून आरडाओरड करतात व निष्कारण भडकतात सुद्धां. पण बालक-मंदिरांत आल्याबरोबर हींच बालकें निराळ्या प्रवृत्तीनें वागतात यांत शंका नाहीं. त्याचबरोबर त्यांना असेंहि आढळून आलें कीं, इतर शाळांमधून जवळजवळ या बालकांच्या घरच्याप्रमाणेंच गैरशिस्तीचें वातावरण असल्यामुळें काम करण्याची प्रवृत्ति व शिस्त यांचा पूर्णपणें अभाव असतो. कांहीं परीक्षांमध्यें मुलांना उत्तीर्ण करणें व कसें तरी शिस्तीचें पालन करणें यासाठीं या इतर शाळांतील शिक्षक धाकदपटशा दाखवून, किंवा लाडीगोडी दाखवून, किंवा बक्षिसें देण्याचें आमिष दाखवून आपले कार्य करीत. त्यामुळें शिक्षक व बालकें यांच्यामध्यें एक तऱ्हेचें वैर निर्माण झालेलें दिसून येई. त्यामुळें शिक्षक वर्गांतून

बाहेर गेल्याबरोबर वर्गांत आरडाओरडा, पुस्तकें फेंकणें, एकमेकांवर दौती फेकणें व शाईनें भिंती रंगविणें यांत बालकें गढून जात आणि मधल्या सुटींत तर कांहीं विचारूंच नका ! नेहमीं दंगामस्ती, एकमेकांशी कुस्ती आणि अंगापिंडानें धडधाकट असणाऱ्या बालकांना इतर अशक्त बालकांशीं लढण्यांत विलक्षण आनंद वाटत असे. या साध्या शाळांतून व बालक मंदिरांतून एवढा विलक्षण फरक कां आढळून यावा, मादाम मॉंटेसोरींच्या शाळांतून अशा कोणत्या लोकविलक्षण गोष्टी असाव्यात कीं ज्यांचा इतर शाळांमधून पूर्ण अभाव असूं शकेल, याच गोष्टींचे मादामनीं अत्यंत कसोशींनें संशोधन केले. हा फारक असण्याचें मुख्य कारण म्हणजे घरांतील वातावरण होय. त्याठिकाणीं बालकांना कोणत्याहि प्रकारचें स्वातंत्र्य देण्यांत येत नाहीं. त्यामुळें बालकांतील उपजत गुण म्हणजे आपण स्वतः कोणाच्याहि मदतीशिवाय कार्य करावें असें वाटणें होय. आणि याचा तर त्या घरीं पूर्णपणें अभाव. त्यामुळेंच बालकें चिडून आरडाओरडा करून शिस्तीचा भंग करतात.

कांहीं कालानंतर आपल्या बालकांत फरक घडून येतो हें आढळून आल्यावर कांहीं तरुण स्त्रिया मॉंटेसोरींना त्यांच्या कामांत मदत करण्यासाठीं संस्थेंत आल्या. त्या शिकून तयार झाल्यानंतर त्यांच्या सहाय्यानें मादामनीं इतर बालकमंदिरें स्थापन केलीं.

त्यावेळीं रोममध्यें आणखी इतर प्रकारच्या शाळा होत्या. त्यांच्यातील वातावरण पडताळून पहावें म्हणून डॉ. मॉंटेसोरी बाई त्या शाळांतून जाऊन निरीक्षण करूं लागल्या. त्यांपैकीं एक शाळा अशीं होती कीं, ज्याठिकाणीं सिसिली बेटांतील धरणीकंपामुळें अनाथ झालेलीं बालकें होतीं, आणि ही संस्था कॅथॉलिक सिस्टर्स चालवित असत. दुसरी एक

संस्था, सोशॉलिस्ट लोकांनीं चालविलेली शाळा होती, व तिसरी रोममधील इंग्लिश वकिलातींनी चालविलेली शाळा होय. या तिन्ही शाळांतून माँटेसोरी पद्धतीचा अवलंब केल्यामुळें बालकांच्यामध्ये तोच फरक घडून आलेला माँटेसोरी बाईंना दिसला. त्यावरून त्यांनीं अशी अटकळ केली कीं, बालकें जीं उद्धटपणानें वागतात तो त्यांचा स्वभाव, त्यांच्या आशाआकांक्षा दाबल्या गेल्यामुळे बनलेला होता. यावरून त्यांना बालकांना पूर्ण स्वातंत्र्याची भूक लागलेली असते व त्यासाठीं तीं धडपडत असतात व ही भूक न शमल्यामुळें ती विध्वंसक वृत्तीची बनतात, हा शोध लागला.

## बालकांच्या वृत्तीचें मूळ

आज हजारों वर्षें बालकांच्या वृत्तीचें मूळ कशांत आहे त्याचा शोध कोणालाच लागलेला नव्हता. तो माँटेसोरी बाईनीं लावला. आजकाल साऱ्या जगभर आढळून येणारीं बालकें आपला मूळ स्वभाव दाबून ठेवून दुष्टपणा, संताप, मोडतोड वगैरे गुण दाखवितात हा त्यांचा बनलेला स्वभाव आहे. वरवर बालकांविषयी प्रेम दाखवून त्यांना वातावरणांत गुलामाप्रमाणें वागविले जातें हें सत्य आहे. त्याचप्रमाणे बालक म्हणजे पालकांचे वित्त आहे अशी समजूत दृढ झाली असल्यामुळें प्रत्येक पालक बालकांवर आपला हक्क गाजवू चाहतो. मग तो पालक असो वा शिक्षक असो. सर्वांची एकच मनःप्रवृत्ति कीं, बालकांना कांही एक हक्क नाही !

याबरोबरच मादामना मानवी स्वभावांतील कांहीं गूढ गोष्टी दिसून आल्या. त्या म्हणजे जे जे गुण बालकांत स्वभावतः असावेत असें वाटते ते गुण कमविण्यासाठी बालक कसोसीनें मेहनत करीत असतें. मानवी प्राणी व इतर प्राणी यांच्यांतील फरक दाखविणारे

जे जे गुण आहेत ते जन्मतः बालकांत आढळून येत नसून ते त्याला मेहनतीनें मिळवावे लागतात व ते अनुभवानें आत्मसात करावे लागतात. उदाहरणार्थः—भाषासाधन, शौर्य, स्वाभिमान, राष्ट्राभिमान, धार्मिकवृत्ति इत्यादि. प्रौढ माणसे बालकांना तयार करीत नसून बालकेंच स्वतः अंगमेहनतीनें प्रौढ बनत असतात, हा मादाम मॅांटेसरीचा अत्यंत मोठा शोध आहे. बालक उपजतांच अगदी असहाय असते. त्याला हालचाल करतां येत नाही. समजण्याची बुद्धि नाहीं. तेंच बालक कालावकाशानें एक अत्यंत बुद्धिमान मानव बनतें, याचेंच साऱ्यांना आश्चर्य वाटतें. पण बालक आपल्या उपजत स्वभावानुसार बुद्धिवान प्रौढ होण्याआधीं किती कष्ट सोशीत असतें व आस्ते आस्ते किती खटपट करीत असतें आणि आपल्या भोंवतालचे वातावरण आत्मसात करीत असते हें पाहून कोणालाहि अचंबा वाटेल.

## नवराष्ट्रावरील जबाबदारी

नवीन राष्ट्र निर्माण करावयाचें असल्यास बाल्यावस्थेपासून बालकांच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे आवश्यक आहे हें आपोआपच सिद्ध झालें. चांगलें बालक तयार झालें कीं सर्व दृष्टींनीं चांगला नागरिक, तयार होईल, तरच चांगले राष्ट्र तयार होईल. अशी ही परंपरा आहे. याच्या उलट बालकांचें काम वाईट तर नागरिकांचे काम वाईट झालेंच म्हणून समजावें व अशा परंपरेंत मानवतेचा अधःपात झालाच पाहिजे हें निर्विवाद आहे.

## मादाम मॅांटेसोरींनीं शोधलेले मूलभूत सिद्धांत

वैद्यकीचा धंदा सोडल्यानंतर मादाम मॅांटेसोरी यांनीं बालकांच्या उन्नतीसाठीं आपलें सारें आयुष्य खर्च केलें, बालकांच्या शिक्षण पद्धतीचा शोध करीत असतां बालकांचा विकास कसकसा होत जातो याचा

त्यांना शोध लागला व त्याविषयी त्यांनी सविस्तरपणे आपल्या पुस्तकांत वर्णन केले आहे. ती पुस्तकें म्हणजे बालजीवनाचें रहस्य व शोषक मन. बालविकासासाठीं त्यांनीं विवक्षित प्रकारची उपकरणें शोधून काढलीं. त्यांवरून बालकांची स्वतः कार्य करण्याची प्रवृत्ति व ज्ञान मिळविण्याची लालसा या दोन्ही गोष्टींना पूर्णपणें वाव देण्यांत आलेला आहे. मादामच्या मॉंटेसोरी मेथड व ॲडव्हान्स मॉंटेसोरी मेथड या पुस्तकामध्यें त्यांनी तयार केलेल्या उपकरणासंबंधीं सर्व माहिती पुरविली आहे. त्यांत त्यांनी मुख्यतः असें म्हटलें आहे कीं, बालकांना कांहींतरी शिकविणें हा त्यांचा मुख्य हेतु नसून स्वतःच विकास करून घेण्यासाठीं त्यांनीं स्वयंप्रवृत्त व्हावें हा आहे.

## मॉंटेसोरी पद्धतीच्या शाळांची वाढ

यानंतर सर्व जगभर मॉंटेसोरी शाळा स्थापन करण्यांत आल्या. "नवीन बालकें" या शाळांमधून निर्माण होत असलेलीं पाहून मादामना अत्यंत संतोष होत असे. मग तीं बालकें कोणत्याहि राष्ट्राची असोत किंवा कोणत्याहि संस्कृतीची असोत. ज्याप्रमाणें त्यांच्या स्वतःच्या शाळांतून बालकांचा उत्साह वृद्धिंगत होत गेलेला आढळून येतो, तद्वतच दरेक शाळांतून तो आढळून येतो हें आश्चर्यकारक आहे. यावरून मानवी स्वभाव हा कोणाहि शिक्षकापेक्षां अधिक बलवत्तर आहे हें सिद्ध झालें. बालकमंदिरांतील बालकांमागें केव्हांहि अभ्यासाचें टुमणें लावावें लागत नाहीं. तीं आपोआपच स्वयंप्रवृत्तीनें व स्वतःच्या उत्साहानें कामास लागतात व आपल्या कामांत दंग होऊन जातात, आणि आपल्या अनुभवाच्या आनंदाची लयलूट करतात. बालकमंदिरांतील सारीं बालकें म्हणजे पांच वर्षांच्या आंतील बालकें हीं सहज आपल्या मातृभाषेंतील लहान लहान पुस्तकें वाचूं शकतात. हें पाहून

आईबापांना व इतर माणसांना आश्चर्य वाटतें. लिहिणें व वाचणें आणि लहान लहान सोपीं उदाहरणें सोडविणें हें बालकांना सहज



**श्री. सौ. सुलोचनाबाईंच्या बालकमंदिरातील बालकें १९७०**

करतां येतें व त्याचप्रमाणें भूगोल, वनस्पती, प्राणी व व्याकरण इत्यादि अवघड विषयांत सुद्धां त्यांना आनंद वाटतो. पुढें तीं ७ वर्षांची झाल्यावर गणितांतील मोठमोठालीं उदाहरणें सोडविणें, बीजगणित व भूमिति यांतील प्रमेयें सोडविणें व व्याकरणांतील शब्द-विश्लेषण करणें अशा रुक्ष विषयांत सुद्धां मन घालणें बालकांना सहज साधतें, हा याच बालकमंदिरांतील शिक्षणपद्धतीचा विशेष आहे. गेल्या ६२ वर्षांत मॉंटेसोरी बाईंनीं अविश्रांत श्रम केलेले आहेत व त्यांच्या वयाला

८० वर्षें पूर्ण होत असतांना सुद्धां एका तरुण व्यक्तीला शोभेल असा त्यांचा दुर्दम्य उत्साह होता. व्याख्यान देणें, वर्गांत शिकविणें व बालकांशीं समरस होणें या त्यांच्या गुणांमुळें त्यांना हा उत्साह नेहमीं आनंदित करीत असे. वर म्हटल्याप्रमाणें त्या म्हणतात, “ माझ्या खऱ्या कार्याला आतां सुरवात होणार आहे. ” पण राष्ट्राराष्ट्रांतील दुहीमुळें हिंसावृत्तीला महत्त्व मिळालें व ज्या बालकांसाठीं मादामनी अविश्रांत परिश्रम केले त्यांची युद्धाच्या होमकुंडांत होळी झालेली पाहून त्यांचें अंतकरण तिळतिळ तुटलें. त्या स्वतःच दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडून देशांतराला लागल्या व महायुद्धामुळें त्यांना आपलें सर्वस्व गमावून बसावें लागलें. तरी पण त्यांनीं बालकांसाठीं केलेला आत्मयज्ञ आतां फळास येऊन जगामध्यें शांतता नांदेल व युद्धेंहि समूळ नष्ट होतील अशी आशा उत्पन्न झालेली आहे. बालक आणि बालकांचें स्वातंत्र्य म्हणजेच राष्ट्र व राष्ट्रांचें स्वातंत्र्य. बालकें आपापसांत भांडूं लागलीं व एकमेकांशीं हेवादावा करूं लागलीं कीं, यांच्यामधून निर्माण होणारे नागरिक त्याच वृत्तीनें वागतील व जगांतील शांतता कायमची नष्ट होईल. यासाठीं राष्ट्र निर्माण करायचें तें बालकांपासूनच निर्माण करण्यांत यावें असा मॉंटेसोरींचा जगाला संदेश आहे.

## असोसिएशन मॉंटेसोरी इन्टरनॅशनल संस्था

ही संस्था कोपनहागन येथें १९२९ सालीं स्थापण्यांत आली. या संस्थेचे मूळ उद्देश—

( १ ) समाजांतील बालकांच्या हक्कांचें संरक्षण करून जगाच्या संस्कृतीसाठीं बालकांचे केवढें महत्त्व आहे हें जगाला पटविणें. त्याचप्रमाणें उपेक्षित नागरिक या नात्यानें आपण बालकांकडे न पहातां

त्यांची जी योग्य पदवी समाजामध्यें आहे ती, समाजाला पटविणें व त्यासाठीं आवश्यक असलेले कायदे पास करून घेणे.

( २ ) बालमानसाचा विकास कोणत्या प्रकारें व कोणत्या सिद्धांतानुसार होतो याचा जनतेंत प्रसार करणें. शाळांतून व घरांतून बालकाला स्वाभाविक रीत्या विकास होण्यास मदत करणें. बाल-मानसशास्त्राच्या सिद्धांतानुसार शैशवावस्था यांमध्यें मानसिक आरोग्याचें संरक्षण करणें, त्यांच्या विकासास कारणीभूत होणें.

( ३ ) आजचा बालक उद्यांचा पालक होणार आहे हा विचार जनतेंत पसरवून प्रौढांची बालकांविषयीं कोणती जबाबदारी आहे तें नीट पटवून देणें व स्वतंत्र बालकाचा, स्वतंत्र नागरिक होईल हा विचार जनतेस पटवून देणें.

( ४ ) आतांपर्यंत अनुभवानें सिद्ध केलेले, मॉंटेसोरीबाईचें शैक्षणिक सिद्धांत जनतेंत पसरवून, शिक्षणाच्या प्रत्येक प्रणालींत, त्याचा भरपूर उपयोग करून घेणें.

( ५ ) नव्या प्रकारची एक सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठीं बालकांच्या हक्कांचें संरक्षण करणें व या सामाजिक सुधारणेची धर्म, राजकारण इत्यादींपासून फारकत करणें. पण कोणत्याहि जातीचें, कोणत्याहि धर्माचें, कोणत्याहि वर्णाचें बालक हें एकच असतें ही भावना जगांत रूढ करणें.

या असोसिएशनच्या शाखा साऱ्या जगभर म्हणजे युरोप, अमेरिका, एशिया, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका इत्यादि खंडांत सर्वत्र पसरलेल्या आहेत. मध्यंतरी महायुद्धामुळें कांहीं संस्थांचें काय कांहीं काळपर्यंत तहकूब राहिलें असलें तरी पुनः त्यांच्या कार्यास नवीन जोमानें सुरयात झालेली

आहे ही आनंदाची गोष्ट होय. डॉ. मॉंटेसोरी व मि. मॉंटेसोरी या दोघांनीं मॉंटेसोरी संस्थांच्या शाखा हिंदुस्तान व सिलोन या ठिकाणीं स्थापण्यासाठीं अविश्रांत श्रम केलेले आहेत. हॉलंडमधील मध्यवर्ती मॉंटेसोरी संस्थेची पुनर्घटना करण्यांत येऊन इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स इत्यादि देशांत मॉंटेसोरी शिक्षक तयार करण्यासाठीं ट्रेनिंग कोर्सेस उघडण्यांत आले आहेत. डॉ. मॉंटेसोरी व मि. मॉंटेसोरी यांना आपल्या इटालियन सरकारनें बहुमानानें बोलाविलें होतें. त्यांनीं लवकरच आपलें पूर्वीचें बालशिक्षण केंद्राचें काम रोम येथे पुनः सुरू केलें. सर्व भाषांतून मॉंटेसोरी पुस्तकांचीं पुनर्मुद्रणें होत असून नव्या नव्या शाळा स्थापन केल्या जात आहेत आणि मॉंटेसोरी शिक्षकांची मागणी दिवसेंदिवस एकसारखी वाढतच आहे. मानवी प्रयत्नानीं निर्माण केलेल्या किती तरी कार्ये महायुद्धाच्या खाईत जळून गेली असल्या तरी बालकांविषयींचें प्रेम त्यांपासून निर्माण झालेलें आहे हें दरेक स्त्री-पुरुषाच्या अंतःकरणाला पूर्णपणें पटलेलें आहे व दरेक राष्ट्राच्या सरकारला ही गोष्ट पटेल अशी अपेक्षा आहे. मॉंटेसोरी शिक्षणपद्धतीमुळें जगांत शांतता निर्माण होईल व राष्ट्राराष्ट्रांत सलोखा नांदू लागेल तर साऱ्या जगांतून युद्धाचा नायनाट होईल. मानवी जीवनांत सौख्य व समधान निर्माण होईल आणि जगाच्या इतिहासांत **बालशिक्षण व मॉंटेसोरी हे शब्द** सुवर्णाक्षरांनीं लिहिलेलें पाहण्याचा सुयोग लवकरच प्राप्त होईल.

**उपेक्षित नागरिक**:—आजचा बालक जर उपेक्षित राहील तर उद्यांचा नागरिक उपेक्षित रहाणार हें निःसंशय आहे. यासाठी नागरिकाला उपेक्षित करणें हें योग्य आहे काय याचा राष्ट्रधुरा वाहाणाऱ्या राज्यकर्त्यांनीं विचार करावा. हिंदु, खिस्ती, मुसलमान, पारसी इत्यादि धर्मांविषयीं अभिमान कोण बाळगतो ? बालकच. त्याचप्रमाणें

हिंदी किंवा इटालियन रहातो तो कोणामुळें ? बालकामुळेंच. जगामध्यें यापुढें महायुद्धें न व्हावींत व प्रेमाचें साम्राज्य सर्वत्र पसरावें आणि घरीं दारीं आनंदी वृत्ति, उत्साही वातावरण दिसावें असें आपल्याला वाटत असल्यास बालकाची उपेक्षा करूं नका असें मॉंटेसोरीबाई मोठ्या कळकळीनें जगाला संदेश देऊन गेल्या आहेत.

**नवीन जगाची आशा**:—जगामध्यें धार्मिक वृत्ति वाढावी, मानवतेंत भर घातली जावी व कोनाकोपऱ्यांतून समाधान व सौख्य आढळावें असें वाटत असेल तर दरेक बालकाच्या अंतःकरणांत प्रेमाची ज्योत पहिल्यानें पाजळविण्यांत आली पाहिजे. पण आपण या गोष्टींची उपेक्षा केली तर वातावरणांत काळे कुट्ट ढग वावरूं लागतील व जगाचा विकास होण्याऐवजीं त्याचा अधःपात मात्र होईल.

डॉ. मॉंटेसोरीबाई व मि. मॉंटेसोरी यांचें ऐहिक दृष्ट्या सर्वस्वी नुकसान झालें असतांहि दुर्दम्य उत्साहानें ते दोघेहि पुनः कामास लागले होते व आम्हांला अशी उमेद वाटत होती कीं, मुंबईस लवकरच स्थापन होणाऱ्या मॉंटेसोरी मध्यवर्ती संस्थेच्या उदघाटन समयीं ते हजर रहातील व आपला पूर्ण आशीर्वाद या संस्थेला बहाल करतील. पण ईश्वरी योजना अतर्क्य खरी !

हिंदुस्थानांतील आपलें कार्य संपवून मादाम मॉंटेसोरी या कराचीस गेल्या. तेथीऴ कार्य संपल्यावर त्या सान् रेमो येथील "जागतिक मॉंटेसोरी शिक्षण परिषदेच्या बैठकीसाठी" मि. मारिओ मॉंटेसोरी व मिसेस मॉंटेसोरी यांच्या समवेत परत इटलींत गेल्या.

१९५२ च्या मे ६ ला त्या नोर्डविक् ( हॉलंड ) येथें मेंदूत रक्तस्राव झाल्यामुळें मरण पावल्या. शिक्षण विषयांत आमूलाग्र फरक केला जावा

यासाठीं सतत तळमळणारा—राबणारा जीव या थोर विदुषीच्या कुडींतून मोठ्या कष्टांनेच गेला असला पाहिजे !

त्यांचे पुढील कार्य त्यांचे मानस पुत्र मि. मारिओ मॉंटेसोरी हे रोम येथे चालवीत आहेत. मधून मधून ते लंडन मध्येही आपला कोर्स घेत असतांत.

हिंदुस्थानांत मादामचे खास प्रतिनिधी मि. यूस्टन हे दरवर्षी निरनिराळ्या शहरांत शिक्षक कोर्स चालवीत असतात. कधी कलकत्यास तर कधी दिल्लीस तर कधीं बनारस येथे. १९५० सालीं हा कोर्स मुंबईस सेंट झेविअर कॉलेजात घेण्यांत आला होता, तेव्हां प्रस्तुत लेखक आर्गनायझिंग सेक्रेटरी या नात्याने काम करीत होते व सौ. सुलोचनाबाई हुदलीकर यांनीं शिक्षिकेचें काम पत्करले होते. आतां तो कोर्स पुनः मुंबईस घेतला जाण्याचा संभव आहे.

* * *

# मादाम मारिया मॉंतेसोरी

जन्म ( इटली ) ३१ ऑगस्ट १८७०

**– जन्मशताब्दिनिमित्त –**

३१ ऑगस्ट १९७०

आतां पर्यंत प्रसिद्ध झालेल्या आमच्या बालकमंदिर मासिकांत मॉंटेसोरी शिक्षण पद्धती विषयीं व तिच्या उपयुक्ततेविषयी बरेच लेख आलेले आहेत. बऱ्याच लोकांच्या कडून खुद्द मॉंटेसोरी बाईंच्या चरित्राविषयीं विचारणा करण्यांत आली असल्यानें ती आम्हीं आमच्या या पुस्तिकेत सविस्तरपणे देत आहोंत. या लेखाबरोबर मादामचा आम्ही स्वतः काढलेला फोटो मुद्दाम आर्ट पेपरवर छापून देत आहोत. त्यावर मादामची स्वाक्षरीं असल्यानें त्याचें आज विशेष महत्व आहे. प्रत्येक बालक-मंदिरांत हा फोटो प्रामुख्यानें टांगण्यांत यावा. मादाम मॉंटेसोरींची आठवण त्यामुळें बालकांना नेहमीं होत राहील.

जनतेमध्ये मॉंटेसोरी शिक्षण पद्धतीचा प्रसार जितक्या अधिक झपाट्यानें होईल तितक्या प्रमाणांत आमच्या भावी नागरिकांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली जाईल अशी आम्हाला खात्री आहे. जगामध्ये सौख्य नांदावे, समाजांत समाधानी वृत्ती निर्माण व्हावी अशीच आमच्या प्रमाणे दरेकाची इच्छा असणार, पण तें साध्य करण्या-साठीं आपल्याला आटोकाट प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, हें मात्र फारच थोड्या लोकांना पटलें आहे. मध्यवर्ती सरकार व प्रांतिक

सरकार यांना बालशिक्षणाचें महत्व पटलेलें आहे हें आम्हाला स्वानुभवावरून माहीत आहे. तरी पण मॉंटेसोरी पद्धतीचा प्रसार साऱ्या भारतभर करण्यासाठीं आमचे सरकार व आमची जनता पूर्णपणें मदत करील अशी आम्हाला उमेद आहे.

येथे दिलेल्या चरित्रावरून मादाम मॉंटेसोरींचें अत्यंत वाचनीय लिखाण हाताळण्याचें औत्सुक्य निर्माण होईल अशी आम्हाला पूर्ण उमेद आहे. मादाम मॉंटेसोरींनी जन्मभर अविश्रांत श्रम करून जगभर शांतता पसरावी या साठीं जे कष्ट सोसले त्या बद्दल आपण त्यांचे उतराई आहोंत. एकंदर शिक्षणपद्धतींत क्रांति घडवून आणावयाची असेल तर मूळ पाया पासूनच ती करणें भाग आहे. आणि शिक्षणाचा मूळ पाया म्हणजेच मॉंटेसोरीनी प्रस्थापित केलेली बालकमंदिर पध्दति होय.

* * *

REFBK-0017747